
Module - 7

# अशक्त नवजात बाळाची देखभाल

## शेवटी किती अशक्त बालके वंचित राहत आहेत?

### विषय - N ३







# समिक्षा - १

**कार्ड दाखवून लिहलेले वाचावयास सांगा.**

**विचारा :**
तुम्हाला लक्षात आहे का तुम्ही अशक्त नवजात बालकाला कसे ओळखाल? उजवी कडे दिलेल्या माहितीचा वापर करून चर्चेला सुरूवात करा आणि बरोबर उत्तरे शोधा.

चर्चे दरम्यान हया गोष्टींकडे पण लक्ष दया कि कार्यकर्ती एलएमपी चा उपयोग करता करता जाणून घेतात का, कि बाळाचा जन्म योग्य वेळी झाला आहे कि नाही.

**जन्माच्या दिवशी** खाली दिलेल्या तीन स्थितींचे अवलोकन हे आपणांस कळू शकते की बाळ अशक्त आहे किंवा नाही.

१. जन्माच्या वेळी बाळाचे वजन २००० ग्रॅम किंवा त्यापेक्षा कमी आहे का?

२. बाळाने गर्भावस्थेच्या साडे आठ महिन्यांच्या अगोदर जन्म घेतला आहे का?

३. बाळ चांगल्या प्रकारे स्तनपान करत नाही.

खाली दिलेल्या प्रश्नांपैकी एकाचे उत्तर जरी हो असेल तर समजावे कि जन्मलेले बाळ हे अशक्त आहे.


अशा बाळाला जिवंत ठेवण्यासाठी खास देखरेखीची आवश्यकता असते.




# समिक्षा - १

## आपण कसे जाणून घ्याल कि जन्मलेले बाळ हे अशक्त आहे.












# समिक्षा - २

**कार्ड दाखवा प्रश्न वाचायला सांगा आणि सर्व सहभाग्यांना एका - एका प्रश्नांचे उत्तर सांगण्यास सांगा.**


**विचारा कि कोणत्या रजिस्टरमध्ये आपल्याला अशक्त बाळाची माहिती मिळेल.**

सर्व कार्यकर्त्यांना सांगा कि गेल्या तिन महिन्यांपासून जन्मलेल्या बाळांची संख्या गर्भवती / बाळंतीन यांचे रजिस्टर पाहा, तसेच माहिती मिळवा कि जन्मलेल्या बाळांपैकी किती बाळे हि अशक्त जन्मलेली आहेत. या माहितीत अशा बाळांचा हि उल्लेख करा की जी जन्मानंतर मृत्यू पावलेली आहेत.

उजव्या बाजूला दिलेल्या निर्देशांचा उदाहरणांसाठी उपयोग करून सर्व अशक्त बाळांच्या संख्यांची बेरिज करा.

अशक्त बाळांची टक्केवारी काढा. जर एकूण बालकांपैकी दहा टक्के बाळे अशक्त नसतील तर असा निष्कर्ष येतो की अजुन काही अशक्त बालके वंचित आहेत. याची कल्पना कार्यकर्तींना दयावी.


| | |
|---|---|
| एकूण अंगणवाडी केंद्र ज्यांची संख्या आता जोडा | |
| या केंद्रात मागीला तीन महिन्यांत जन्मलेली एकूण बालके | |
| एकूण जन्मलेल्या बालकांपैकी किती बालके हि जन्मत:च अशक्त आहेत. | |




# समिक्षा - २



माझ्या गावात मागील तीन महिन्यांत जन्मलेल्या सर्व बालकांमध्ये किती बालके हि जन्मत:च अशक्त होती ?







# अभ्यास

**कार्यकर्त्यांना सांगा कि साधनांची पेटी काढा व एलएमपी - ईडिडि चा तक्ता खोला.**

गर्भवतींच्या नोंदणीचे रजिस्टर उघडण्यास सांगा.
रजिस्टरच्या नोंदणीनुसार मागील तीन महिन्यांत प्रत्येकी प्रसूती साठी लिहिलेल्या एलएमपीचा उपयोग करून ईडिडि तसेच डिओएमची मोजणी करा.
डिओएम तसेच डिओडि ची तुलना करताना हयाकडे लक्ष दया, कि एखादि अशी घटना कि ज्यात डिओडी ही डिओएम च्या पहिली तर येत नाही ना.
गरज वाटल्यास पानाच्या उजव्या बाजूला बनविलेल्या चित्रांचा उपयोग करुन सहभाग्यांची मदत करा.

हया अभ्यासानंतर पुन्हा अशक्त बाळांची (ज्यांची डिओडी,डिओएमच्या पहिले आहे तसेच त्यांचे वजन २००० ग्रॅम किंवा त्यापेक्षा कमी) अशा बाळांची मोजणी करा.

**सहभागिनींना विचारा कि, तुम्ही हयापैकी कोणत्याही बाळाच्या जन्माच्या दिवशी त्याच्या स्तनपानाचे निरिक्षण केले आणि तेव्हा त्याला स्तनपान निट करता येत नाही असे तुमच्या निदशर्नास आले.**

हया गोष्टींकडे लक्ष देण्यास सांगा कि जर त्यांनी बाळाच्या जन्माच्या दिवशी त्याच्या स्तनपानावर निरिक्षण केले असते तर त्यांना आणखी काही अशक्त मुलांची ओळख झाली असती.
डिओएमच्या मोजणी करता गरजेनूसार उजवीकडे दिलेल्या चित्रांचा वापर करा.
हया मोजणीनंतर मिळालेल्या अशक्त बाळांची संख्या कार्डावर लिहा. हे कार्ड सर्वांना दाखवा व खात्री करुन घ्या कि कार्यकर्त्यांना समजले आहे की आपल्याला एकूण किती अशक्त बाळांची ओळख झाली आहे.

आता पुढील कार्डकडे जा.

**तक्ता ३ : प्रसूत होण्याची तारिख (ईडिडि) तसेच प्रसूतीच्या तारखे आधी जन्मलेल्यांची मोजणी**

(प्रसूतीच्या तारखे अगोदर कोणाचाही जन्म अयोग्य आहे.)

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जानेवारी | मासिक पाळीची शेवटची तारिख (एलएमपी) | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | जानेवारी |
| ऑक्टोबर | प्रसूतीची संभाव्य तारिख (ईडिडि) | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | नोव्हेंबर |
| सप्टेंबर | परिपक्वतेची तारिख (डिओएम) | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | ऑक्टोबर |



१५ मिनिटे

N३ शेवटी किती अशक्त बालके वंचित राहत आहेत? F3

# अभ्यास




**एलएमपी-ईडिडि-डिओएम** या तक्त्याचा उपयोग करुन तपास करा की मागील तीन महिन्यांपासून जन्मलेल्या मुलांपैकी किती मुले हि जन्मतारखेच्या अगोदर जन्माला आली आहेत.

एकदा पुन्हा मोजणी करा.

| | | |
|---|---|---|
| १ | **माझ्या अंगणवाडी केंद्राच्या क्षेत्रात एकूण जन्म संख्या:** | |
| २ | **एकूण जन्म झालेल्या बाळांपैकी अशक्त बाळांची संख्या:** | |
| ३ | **आपण सर्व अशक्त बाळांची मोजणी केलेली आहे काय?** | |





# आपण सर्व अशक्त जन्मलेल्या बाळांना ओळखु शकत आहोत?

कार्ड दाखवा व कार्यकर्त्यांना सर्व बिंदु वाचायला सांगा.

सर्व कार्यकर्त्यांना प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्यास सांगा.

जर कोणत्याही प्रश्नाचे उत्तर नाही असे असेल तर त्याला त्याचे कारण विचारा.

चर्चा होवू दया व नाही या उत्तराच्या कारणांची नोंद करा.

उजवीकडे लिहिलेल्या माहितीचा उपयोग करा व चर्चेला पुढे न्या.

१. कसे निश्चित कराल कि एलएमपी हे एकदम बरोबर आहे.

(क) गरोदर पणाची लवकरात लवकर नोंद करा. महिलांना ते विसरण्या अगोदर त्याची एलएमपी ची विचारपूस करुन त्याची नोंद करा.

(ख) काही परिस्थितीत एलएमपी हि कदाचित बरोबर नसू शकते.

१) जेव्हा महिला पहिल्या प्रसूतीनंतर येणाऱ्या मासिक पाळिच्या अगोदरच गर्भवती राहत असतील.

२) जेव्हा महिलांची मासिक पाळी ही अनियमित असेल.

२. ईडिडि जाणून घेण्याचे आणखी काही मार्ग आहेत. डिओएम समजल्यानंतर डिओएमच्या मोजणी तक्त्याच्या वापरातून केली जावू शकते.

(क) पहिल्या तीन महिन्यांच्या सोनोग्राफी रिपोर्ट जर का असेल तर त्यावरुन काढता येणारा ईडिडि, एलएमपी वरून काढण्यात येणारी ईडिडि च्या मानाने जास्त बरोबर असते.

(ख) सहाव्या अथवा सातव्या महिन्यात पोटाची तपासणी करुन डॉक्टर एएनएम अथवा काही प्रमाणात ईडिडि सांगू शकतात. कोणतीही दुसरी माहिती नसताना याचा उपयोग करु शकतो.

३. जर बाळाचा जन्म रुग्णालयात झाला असेल तर जन्माच्या वेळचे वजन रूग्णालयाच्या रजिस्टर मधून प्राप्त होवू शकते.


४. जर जन्मापासून बाळ स्तनपान करण्यात अशक्त असेल तर असे बाळ जन्मजात अशक्त मानले जाते. जरी त्याचे वजन दोन किलो पेक्षा जास्त असेल तरीही किंवा त्याचा जन्म डिओएमच्या अगोदर झाला असेल तरी.



# आपण सर्व अशक्त जन्मलेल्या बाळांना ओळखु शकत आहोत.



जन्मलेल्या १० बालकांपैकी १ बाळ हे अशक्त असले पाहिजे. आपल्या क्षेत्रात या हिशेबाने तुम्हाला किती अशक्त बाळे मिळालेली आहेत ?



**जर नाही तर शेवटि कुठे आपल्याकडून चुक झालेली आहे ?**

१. तुम्ही बरोबर एलएमपीची नोंदणी करत आहात काय ?
२. तुम्ही डिओएमची मोजणी योग्यतेने करत आहात ना ?
३. तुम्ही जन्म:तच बाळाचे योग्य वजन घेत आहात काय ?
४. तुम्ही स्तनपानाचे योग्य निरिक्षण करत आहात काय ?





# सारांश : कोणतेही जन्मलेले अशक्त बाळ आमच्याकडून वंचित राहु नये याकरिता आम्ही काय केले पाहिजे.

कार्ड दाखवा आणि सर्व कार्यकर्त्यांना एक-एक  करुन प्रत्येक बिंदूचे वाचन करण्यास सांगावे.

कार्यकर्त्यांना विचारा कि तुम्ही प्रत्येक बिंदूशी सहमत आहात काय?

या चर्चेत निश्चित करा कि आम्ही हा अभ्यास प्रत्येकि तीन महिन्यांनी परत सुरु करु. हे जाणून घेण्यासाठी कि प्रत्येक अशक्त बाळाला आम्ही पूर्णपणे जाणून घेतले आहे कि नाही.



## सारांश : कोणतेही जन्मलेले अशक्त बाळ आमच्याकडून वंचित राहू नये याकरिता आम्ही काय केले पाहिजे.



१. गरोदरपणाची लवकरात लवकर नोंद करा आणि एलएमपीची नोंदणी लगेच करा.

२. डिओएम ची मोजणी बरोबर प्रकारे करा व लवकरात लवकर माता व तिच्या कुटूंबाला डिओएमच्या सोबत ईडिडिची पण कल्पना द्या.

३. बाळाच्या जन्मानंतर लवकरात लवकर, शक्यतो २४ तासाच्या आत गृहभेट द्या.

४. जन्माच्या पहिल्याच दिवशी बाळाचे वजन करा.

५. जन्माच्या पहिल्या दिवशीच स्तनपानाचे निरिक्षण करा.










# आपण अशक्त बाळाची ओळख झाल्यानंतर त्याच्या योग्य काळजीची खात्री करुन घेत आहात काय?

**कार्यकर्त्यांना विचारा की ते अशक्त मुलांची ओळख करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न करित आहेत काय. योग्य ती कारणे उजव्या बाजूला दिली आहेत.**

**कार्ड कार्यकर्त्यांना दाखवून त्यांना सर्व बिंदुचे वाचन करायला सांगा चर्चा सुरु करा. अशक्त मुलांची देखरेखी करता उजव्या बाजूला दिलेल्या बिंदूंचा उपयोग करुन चर्चा संपवा.**

प्रयत्न करा कि दरवर्षी एका अंगणवाडी केंद्राच्या क्षेत्रात आपल्याला दोन-तीन पेक्षा जास्त अशक्त मुले नक्की मिळू देत ज्यांना कि खास संगोपनाची गरज असेल.

कार्यकर्त्यांना कल्पना दया कि पुढीलवेळी आपण कार्यशाळेत केएमसी व स्तनपानात मदत यावर चर्चा करु.

**अशक्त बाळाची ओळख व देखभाल यासाठी महत्वाची आहे कारण की,**

१. अशक्त बाळाची मृत्यूची शक्यता, सशक्त बाळांच्या तुलनेत खुप जास्त असते.
२. जर व्यवस्थित देखरेख असेल तर अशक्त बाळाच्या जिवानाची आपण खात्री देवू शकतो.
३. अशावेळी ही देखरेख घरच्या घरी पण केली जावू शकते.

**अशक्त बाळाच्या देखभालीचे टप्पे खालीलप्रमाणे आहेत.**

१. बाळाला ऊब मिळेल यावर विशेष भर दया. जितके शक्य आहे तितके अधिकाधिक केएमसी चा वापर करा. याशिवाय सुती कपडा जसे जुनी साडी अथवा धोतर ची घडी करुन बाळाला त्यात गुंडाळून ठेवा आणि बाळाला आपल्या शरिराच्या ऊबेत ठेवा.
२. स्वच्छतेवर जास्त भर दया, कोणत्याही कारणास्तव बाळाला हात लावण्या अगोदर, जसे कि त्याची अंघोळ, दूध पाजणे अथवा कपडे बदलने च्या अगोदर हात साबणाने धूवावे व हात धूतल्यानंतर ते कोणत्याही कपडयाने पुसू नका त्याला हवेने सुकू दया.
३. स्तनपानावर जास्त लक्ष दया. बाळाला वारंवार स्तनपान करा. प्रत्येक १ - २ तासांनी त्याला जागे करुन. जर बाळाला एका स्तनातील स्तनपान करता करता दोन्ही स्तनातील दूध त्याला पुरत नसेल तर दोन्ही बाजुने थोडा थोडा वेळ पाजावे, म्हणजेच एका वेळी एका स्तनातून दूध पाजले तर दुसऱ्या वेळी दुसऱ्या बाजूने. गरज वाटल्यास दूध एका छोटयाश्या वाटित काढून ठेवावे व नंतर छोटया वाटिने अथवा कपाने बाळाला दूध पाजावे.

जोपर्यंत अशक्त जन्मलेले बाळ ताकतिने स्तनपानात सुरुवात करत नाहि आणि त्याचे वजन जास्तीत जास्त प्रमाणात वाढत नाही तोपर्यंत त्याला विशेष देखभालीची आवश्यकता आहे.



# आपण अशक्त बाळाची ओळख झाल्यानंतर त्याच्या योग्य काळजीची खात्री करुन घेत आहात काय ?



सर्व बालके ज्यांची ओळख आपल्याला अशक्त बाळ या रुपात झालेली आहेत.

१. आपण प्रत्येक आई-वडिलांना सांगत आहात कि त्याच्या बाळाला खास देखरेखीची आवश्यकता आहे.

२. प्रसूतीनंतर पहिल्या आठवडयात आपण दिवसातून कमीत कमी एकवेळा त्या कुटूंबाला भेट देवून बाळाच्या चांगल्या देखरेखिची खात्री करुन घेत आहात काय ?

३. आपण जाणून घेतले आहे कि कोणत्या बाळाचे वजन हे १५०० ग्रॅमपेक्षा हि कमी आहे व त्यांना दूध अजिबात गिळता येत नाही ? आपण अशा बाळांना जवळच्या एसएनसीयु च्या केंद्रात पाठवत आहात काय ?















# हात कसे स्वच्छ धुवाल याचा सराव करा.


कार्ड दाखवा.

हात धुण्याच्या सुचना व नियम यांचे प्रशिक्षण देताना, उपलब्ध पाणी आणि साबणाने सर्व कार्यकर्त्यांनी हात स्वच्छ धुण्याचा सराव करावा.




# हात कसे स्वच्छ धुवाल याचा सराव करा.









# अशक्त बाळांची ओळख व देखभाल यांची नोंदणी करावी.

कार्ड दाखवा आणि प्रत्येक सहभागीला एका - एका बिंदुचे वाचन करण्यास सांगा.

चर्चे ला पुढे न्या.

उजव्या बाजुला दिलेल्या बिंदुचा वापर करुन प्रत्येक प्रश्नाचे उत्तरे दया.

**अशक्त बाळांबद्दल माहिती आपण कुठे नोंदवून ठेवू शकतो :**

आशा गृहभेट योजना नोंदणी आणि राज्याच्या इतर दुसऱ्या नोंदणी योजनेमध्ये माहिती ची नोंद करावी.

**अंगणवाडी कार्यकर्त्यांनी हि माहिती खालील नमूद केलेल्या रजिस्टर मध्ये नमूद करा.**

★ गर्भावस्था एलएमपी/ईडिडि/डिओएम ची माहिती नोंदणी क्रमांक ४ मध्ये नोंदवा. जर मातेचे नाव पहिल्यापासून कुटूंबाच्या पानात नोंदले नसेल तर त्याची नोंद नोंदणी क्रमांक १ मध्ये करा.


★ वेळेआधी होणाऱ्या प्रसूती पिडितेची माहिती नोंदणी क्रमांक ९ भाग २ मध्ये नोंदवा. (गर्भाधारने संबंधीत अडचणींसाठी याचा उपयोग करा.)

★ गृहभेटी दरम्यान झालेल्या अशक्त बालकांची ओळख: नोंदणी ८ (गृहभेट योजना नोंदणी कॉलम ५ किंवा ६) नोंदणी ९ भाग १ (बाळांचे प्रकरणाचे व्यवस्थापन अथवा रेफरल, नोंदणी ८).

★ अशा बालकांची ओळख कि जे स्तनपान करण्यात व दूध गिळण्यात असमर्थ आहे. नोंदणी ८ (गृहभेटीच्या वेळी लक्षात आलेले समस्या या नावे नोंदवून ठेवा) अथवा नोंदणी ९ (संदर्भ असलेली समस्या या नावाने नोंदणी करा).

★ अशक्त बाळाचे एक आठवडा सतत केलेली देखरेख व संगोपण : नोंदणी ८, कॉलम ६ अथवा ७, गरजेनुसार.

★ बाळाचा मृत्यू झाल्यावर “अशक्त बाळाचा मृत्यू” याची नोंद नोंदणी १०, कॉलम ८ अथवा नोंदणी ८ मध्ये नोंद करा.



१० मिनिटे

N३ शेवटी किती अशक्त बालके आपल्या सोबत राहतात? F८

# अशक्त बाळांची ओळख व देखभाल यांची नोंदणी करावी.



कोणत्या नोंदण्या आपण खालील परिस्थितीत नोंदवू शकतो:

- एलएमपी/ईडिडि/डिओएम च्या सोबत गर्भवतीची नोंदणी
- वेळेच्या आधी होणाऱ्या प्रसूतीला ओळखणे
- गृहभेटीच्या वेळी अशक्त बाळाची ओळख
- अशा बाळांची ओळख जे स्तनपान व दूध गिळण्यात असमर्थ आहेत
- अशक्त बाळाची एक आठवडाभर काळजी व देखरेख पध्दत
- मृत्यू झाल्यानंतर “**अशक्त बाळाचा मृत्यु**” नोंद करणे





# कार्य योजना :

कार्ड दाखवा.

सहभागीला एक - एक करुन सर्व बिंदुचे वाचन करण्यास सांगा.

उजव्या बाजूस दिलेल्या बिंदुंचा उपयोग करुन चर्चेचे सारांश सादर करा.

कार्यकर्त्यांना विचारा कि तुम्ही यासर्व गोष्टींशी सहमत आहात, आणि तुम्ही यानंतर एकही अशक्त बाळाला वगळणार तर नाही ना.

कार्यकर्त्यांना सांगा की आपण अशक्त बाळाला अंकाची मोजणी करुन त्यांची प्रक्रिया दर तीन महिन्यांनी या बैठकित पुन्हा सांगू, हयाशिवाय पर्यवेक्षक अथवा एएनएम आपल्या गाव भेटी दरम्यान आशा / अंगणवाडी कार्यकर्त्यांच्या सोबत या संस्थांची अंमलबजावणी करतील.


**आज :**

★ आम्ही शिकलो कि, आमच्याकडून किती “अशक्त” बाळांची नोंदणी करने राहून गेले आहे व ती नोंदणी न होण्याचे कारणे ही कळाली आहे.

★ आम्हाला पुन्हा एकदा समजले आहे कि एखादया अशक्त बाळाची ओळख व त्याची देखभाल कशी करु.

★ आम्हाला कळाले आहे कि अशक्त बाळाबद्दल माहितीची नोंदणी कुठे करायची.

★ आम्ही हया बरोबरच स्वच्छतेच्या पध्दतींचा ही अभ्यास केला आहे.




# कार्य योजना :



## यापुढे अशक्त बाळांना वाचवण्याच्या हेतूने आपण काय करूया.

१. यापुढे आम्ही आमच्या विभागातील कोणत्याही अशक्त बाळाला ओळखण्याच्या प्रक्रियेतून सुटू देणार नाही.



२. आम्ही सर्वजण अशक्त बाळांला तोपर्यंत गृहभेट देणार जोपर्यंत ते पूर्णपणे त्या संकटातून बाहेर येत नाहीत.

३. आम्ही सर्व ओळखलेल्या बाळांना व त्याच्याबद्दल दिलेल्या माहितीची योग्य प्रकारे नोंद करू.

